# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील १९ वा रविवार – ११ ऑगस्ट २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू ः** हे स्वर्गीय पित्या, आज आमचे धर्मग्राम पाळकीय मंडळाचे सदस्य तुझे कार्य पुढे नेण्यासाठी स्वतःला समर्पित करीत आहे. आम्ही तुझ्याकडे अशी प्रार्थना करतो की त्यांनी मनापासून व बिनशर्त तुझा पुत्र व आमचा प्रभू येशू ख्रिस्त याचे अनुकरण करावे.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची सेवा करणारे आपले पोप फान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूने त्याचे जगातील प्रभावी व उत्तम सुवार्तिक बनण्यासाठी मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. केरळमधील वायनाड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या भूस्खलन घसरणीत मरण पावलेल्यांच्या आत्म्याना शांती मिळावी, जखमी लोकांना वैद्यकीय मदत मिळावी, तेथील जनतेला शासन व इतर सेवाभावी संघटनेकडून आवश्यक ते साहाय्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. स्वतःला ख्रिस्तसभेच्या कार्यासाठी समर्पित करण्या-या ह्या पाळकीय सदस्यांना प्रभूने आशीर्वादित करावे, त्यांनी आमच्या धर्मग्रामाच्या व भाविकांच्या गरजा शोधून प्रभूच्या प्रकाशात त्या निर्धारित करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. या पवित्र मिस्सा बलिदानात सहभागी झालेल्या आपण सर्वांनी प्रभूच्या वचनाने परिपूर्ण होऊन व त्याच्या अति पवित्र शरीर व रक्ताचे सेवन करून ख्रिस्तसभेचे आदर्श व क्रियाशील सभासद बनावे म्हणून प्रार्थना करू या.

५. तुरूंगात डांबलेल्या आमच्या बांधवावर प्रभूने दया करावी, तुरूंगवासियांची सेवा करण्यासाठी हातभार लावणा-या निःस्वार्थी स्वयंसेवकांना व त्यांच्या कुटुंबियांना परमेश्वराचा आशीर्वाद लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. आपल्या गावपरिवारातील सर्वांना चांगले आरोग्य लाभावे, लहान बालकांवर चांगले संस्कार केले जावेत, वयोवृद्धांची योग्य ती काळजी घेतली जावी, स्त्रियांना सन्मानाने वागविले जावे तसेच आपल्या नोकरी व्यवसायावर प्रभूचा वरदहस्त असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू ः** हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.